पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.महिला व बालकल्याण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - **०८**

**सभावृत्तांत**

दिनांक - **२५/०३/२०२१** वेळ - दुपारी **२.३०** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची **पाक्षिक** सभा **गुरुवार** दिनांक **२५/०३/२०२१** रोजी दुपारी **२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती.सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा. सदस्य सभागृहात उपस्थित होते. काही सदस्य ऑनलाईन पध्दतीने उपस्थित होते.

**१. मा.लोखंडे चंदा राजू - सभापती**

२. मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

३. मा.सविता बाळकृष्ण खुळे

४. मा.राजापुरे माधवी राजेंद्र

५. मा.गायकवाड निर्मला मनोज

६. मा.गीता सुशिल मंचरकर

७. मा.कदम निकीता अर्जुन

८. मा.मंगला अशोक कदम

या शिवाय मा.चारठणकर- उप आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.ऐवले- सहा.समाज विकास अधिकारी, मा.डांगे- वैद्यकिय अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) पंडीत दिनदयाल उपाध्याय - महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम योजनेबाबत – मा.निर्मला गायकवाड, मा.सविता खुळे यांचा प्रस्ताव

विषय क्र.२) खेळणी कपाटासहीत व वर्गातील भिंतीवर बोलके चित्र काढणेबाबत – मा.योगिता नागरगोजे, मा.निकीता कदम यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) अवांतर वाचनासाठी पुस्तके देणेबाबत.- मा.माधवी राजापुरे, मा.योगिता नागरगोजे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) बचत गटांचे अनुदान कालावधी सुधारणा करणेबाबत- मा.सविता खुळे, मा.निकीता कदम यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) कोरोना काळात विधवा झालेल्या महिलांना अर्थसहाय्य करणेबाबत- मा.सविता खुळे, मा.निकीता कदम यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) वॉटर फिल्टर व वॉटर कुलर बसविणेबाबत – मा.योगिता नागरगोजे, मा.निकिता कदम यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७) सॅनिटरी नॅपकिन व्हेंडींग मशीन व डिस्पोजेबल मशीन बसविणेबाबत – मा.सविता खुळे मा.योगीता नागरगोजे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८) मुकबधीर,मतिमंद, अंध व अपंगत्व असणारे गरजुंकरिता सामुदायीक विवाह सोहळयाचे आयोजन करणेबाबत.- मा.सविता खुळे, मा.योगीता नागरगोजे यांचा प्रस्ताव.

अ) दिनांक **१२/०३/२०२१** रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक **०७**) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – २२ विषय क्रमांक - ०१

दिनांक – २५/०३/२०२१

सुचक :- मा.निर्मला गायकवाड अनुमोदक : मा.सविता खुळे

संदर्भ – मा.निर्मला गायकवाड, मा.सविता खुळे यांचा प्रस्ताव.

" नागरवस्ती विकास योजना विभागाकडील महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत महिला, मुले/ मुलींसाठी विविध प्रकारच्या कल्याणकारी योजना राबविल्या जातात. त्यातील " पंडीत दिनदयाल उपाध्याय – महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम " ही प्रशिक्षण योजना मे. अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेने यापूर्वी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत चांगल्याप्रकारे राबविलेली आहे मे. अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था ही नावाजलेली व नामांकित शैक्षणिक संस्था असुन आवश्यकतेनुसार तात्काळ मनुष्यबळाची उभारणी करणेची क्षमता तसेच मोठ्या प्रमाणावरील कामकाज करणेसाठीची आवश्यक असलेली आर्थिक क्षमता व विशेष करून वस्तीपातळीवरील प्रशिक्षण देण्याचा या संस्थेला भरपूर अनुभव आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आय. टी. आय. मार्फत विविध व्यवसायांचे प्रशिक्षण देण्याचे काम चालते. सदरचे प्रशिक्षण हे आय.टी.आय. येथील प्रशिक्षण केंद्रात चालत असते. मात्र " पंडीत दिनदयाल उपाध्याय – महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम " या योजनेअंतर्गतचे प्रशिक्षण हे वस्तीपातळीवर महिलांच्या मागणीच्या ठिकाणी, वेळेत व कालावधीत होत असते. त्यामुळे वस्तीपातळीवर प्रशिक्षण देण्यासाठी आवश्यक ती सर्व पूर्वतयारी करणे, प्रशिक्षण निहाय आवश्यक साधन सामग्री उपलब्ध करणे, सदर प्रशिक्षणासाठी प्रशिक्षक / प्रशिक्षीका यांची नेमणुक करणे, इतर आवश्यक मनुष्यबळ / कर्मचारी यांची नेमणुक करणे, त्यांचे मानधन ठरविणे इत्यादी प्रशासकीय व तांत्रिक कामकाज करणे हे त्यांच्या चालु कामाच्या व्यापाचा व तद्नुषंगीक बाबींचा, सदर योजनेच्या स्वरुपाचा विचार करता सदर योजनेची अंमलबजावणी ही मनपाच्या आय.टी.आय. मार्फत करणे शक्य नाही. सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाच्या शेवटास म्हणजेच साधारणत फेब्रुवारी – २०२२ च्या आसपास मनपाच्या मा. नगरसदस्याच्या निवडणुका होणार आहेत त्याअनुषंगाने मनपातील बहुतांशी कर्मचारी / अधिकारी यांचेवर निवडणुकीचे कामकाजाचा अतिरीक्त भार पडणार आहे. तसेच नजिकच्या कालावधीतच निवडणुकीपुर्वीचे संबंधीत कामकाजास सुरुवात होणार आहे. त्यामुळे कर्मचारी / अधिकारी यांना नियमीत कामकाजास पुरेसा वेळ देता येणार नाही. सदर बाबीचा प्राधान्याने विचार करता मुदतीत व वेळेत योजना सुरु होणेकामी, तसेच निविदा पध्दतीने संस्था निवडीसाठी लागणारा प्रदीर्घ कालावधीचा विचार करता, इच्छुक असलेली कुठलीही महिला प्रशिक्षणापासून दिर्घ कालावधीमुळे वंचित राहू नये प्रशिक्षण लवकरात लवकर सुरु व्हावे या उद्देशाने तसेच वस्तीपातळीवर प्रत्यक्ष केलेल्या चौकशीअंती सदर संस्थेने चांगले काम केल्याचे व त्यांचे कामासंबंधित प्रशिक्षण घेतलेल्या महिलांची तक्रार नसलेबाबतचे निदर्शनास आलेले आहे. तसेच वस्तीपातळीवर विविध ठिकाणच्या महिलांशी विचारविनीमय व चर्चा केली असता बहुतांशी महिलांची सोबत जोडलेल्या " प्रपत्र-अ " मधील नमुद विषयांचे प्रशिक्षण देणेची मागणी आहे. त्यानुसार सदर कामाचा चांगला अनुभव, विश्वासार्हता, मनपा परिसराची इत्यंभुत माहिती असणारी व मोठी आर्थिक क्षमता असलेली मे. अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था या नावाजलेल्या नामांकित शैक्षणिक संस्थेशी व इतर अन्य नामांकित संस्थेशी प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष चर्चा केली असता, माहिती घेतली असता सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाच्या कामासाठी मे.अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था यांचे मार्फत सादर

“प्रपत्र-अ ” मधील नमुद प्रशिक्षण विषयांचे प्रशिक्षण विषयनिहाय सादर अभ्यासक्रम, कालावधी, दर इत्यादीची पडताळणी केली असता ते रास्त असल्याचे निदर्शनास आलेले आहेत. प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम, कालावधी, प्रशिक्षणाशी संबंधीत इतर अनुषंगिक बाबी यावर साधारणत: प्रशिक्षणाचा दर आधारित असतो. तरी देखील सदर संस्थेमार्फत प्रशिक्षण विषयनिहाय सादर एकुण प्रशिक्षण शुल्क (प्रति लाभार्थी प्रत्यक्ष प्रशिक्षण शुल्क + १८% प्रमाणे जीएसटीची होणारी रक्कम रुपये) या रक्कमेच्या ९०% प्रमाणे होणारी रक्कम ही एकुण प्रशिक्षण शुल्क म्हणुन समजण्यात यावी व त्यानुसार प्रति लाभार्थी झालेल्या प्रशिक्षणाचे शुल्क संस्थेस अदा करणेस मान्यता देण्यात यावी त्यामुळे मोठ्या प्रमाणावर मनपाचे आर्थिक हित साधले जाणार आहे. इतर नामांकित संस्थांच्या दराची तुलना केली असता मे. अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था यांचे मार्फत सादर दर हे वाजवी आहेत. त्यामुळे निविदा न मागविता थेट पध्दतीने “ पंडीत दिनदयाल उपाध्याय – महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम ” या योजनेअंतर्गत मनपास्तरावर एकुण १४ विषयांचे प्रशिक्षण हे ठरावासोबत जोडलेल्या “ प्रपत्र-अ ” मधील नमुद तपशिल व मे. अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत सादर होणा-या अभ्यासक्रमानुसार व मनपा मान्य दरानुसार सन २०२१-२०२२ या सालातील दि. ३१/०३/२०२२ अखेरपर्यंतच्या कालावधीपर्यंतचे प्रशिक्षणाचे काम हे औद्योगिक प्रशिक्षण संस्था / केंद्र (पिं.चिं.मनपा.) यांचा मे.अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, पुणे/मुंबई यांचे मार्फत सादर प्रशिक्षण विषयांचा दर, अभ्यासक्रम, कालावधी इत्यादी बाबत अभिप्राय घेऊन व त्यानुसार पुढिल योग्य ती कार्यवाही करुन मे.अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, पुणे/मुंबई यांचेमार्फत देणेस मान्यता देणेत यावी. तसेच प्रशिक्षणातील इच्छुक महिला गटांच्या मागणीनुसार दररोज २ तासांऐवजी त्यांचे मागणीनुसारच्या तासिकेत (एकुण प्रशिक्षण विषयनिहाय कालावधी पुर्ण करुन) त्यांना प्रशिक्षण देणेत यावेत. सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाच्या सदर योजनेअंतर्गतच्या प्रपत्र – “ अ ” नुसारच्या प्रशिक्षण विषयासंबंधीतचे कामकाज हे यापुर्वीच्या कार्यपध्दतीनुसार व सन २०२१-२२ या आर्थिक वर्षीच्या मान्य धोरणानुसार करणेत यावे. तसेच महिलांच्या वेळेअभावी त्यांना इतर पुरक विषयांच्या सलंग्न प्रशिक्षणास प्रवृत्त करु नये. महिला गटांच्या मागणीनुसारच्या कालावधीत व वेळेत शक्यतो त्यांचे मागणीच्या ठिकाणी सदर प्रशिक्षणाचे आयोजन करणेत यावे. सदर योजनेअंतर्गत महापालिका हद्दीतील महिला / मुलींच्या ज्ञानात व कौशल्यात वाढ व्हावी, व्यवसाय करुन त्यांचे आर्थिक उत्पन्न वाढावे, विविध व्यवसाय कलांमध्ये महिलांनी पारंगत होवून त्यांचे दैनंदिन जीवनात त्यांना ते उपयुक्त ठरावे. या महिला सक्षमीकरणाच्या / सबलीकरणाच्या दृष्टीने / हेतूने महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रमांतर्गत महिलांसाठी विविध व्यवसाय पुरक प्रशिक्षणाचे आयोजन करणेत येत असते. त्यामुळे प्रशिक्षित झालेल्या महिला लाभार्थ्यांचे सर्वेक्षण करणे व त्यांचे उत्पन्न किती वाढले, त्यांना रोजगार उपलब्ध झाले अथवा नाही या संबंधित तपासणीचे कामकाज योजनेच्या कामकाजात अंतर्भुत नसावे. विस्मृतीमुळे पुर्वीचे घेतलेले ज्ञान अद्ययावत होणेसाठी, तसेच व्यवसायानुरुप, आर्थिक क्षमतेनुसार, मनाजोगता व झेपेल तो व्यवसाय करावयाच्या उद्देशाने प्रशिक्षीत व अप्रशिक्षीत महिलांना अनेकाविध (विविध) प्रशिक्षणातुन आधुनिक काळाच्या गरजेनुरुप, आत्मनिर्भर व सक्षम महिला उद्योजक बनविणे व रोजगार / स्वयंरोजगारासाठी, उद्योग / व्यवसाय करणेसाठी त्यांना प्रेरित करणे हा सदर योजना अंमलबजावणीचा मुख्य उद्देश व फलनिष्पत्ती आहे. त्यामुळे वस्तीपातळीवरुन आणखी वेगळी माहिती फलनिष्पत्ती बाबत घेणे अपेक्षीत नाही अथवा त्याची जरुरी नाही कारण असलेल्या / मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग करण्याची जबाबदारी ही सर्वस्वी प्रशिक्षण घेतलेल्या महिलांची असते. तथापि, तरी सुध्दा महिलांच्या कल्याणकारी हेतुने त्यांना विविध व्यवसायपुरक विषयांचे ज्ञान देणे हे मनपाचे कर्तव्य आहे. यात नफा / तोटा हिशोब पत्र लागु करु नये अथवा केलेल्या / होणा-या आर्थिक बाबींचा यासंबंधी विचार करणे हे सुध्दा महिलांच्या कल्याणकारी हेतुस बाधा आणणारे आहे. संवेदनशिलता व सकारात्मकता विचारात घेता योजनेच्या फलनिष्पत्तीचा गुणात्मकदृष्ट्या व फार खोलात जाऊन योजनेचा आढावा घेण्याची गरज नाही. त्यामुळे शासकीय / निमशासकीय, सरकारमान्य, खाजगी इत्यादी तसेच पिंचिंमनपाअंतर्गत व नागरवस्ती

विकास योजना विभागातील महिला व बालकल्याण योजनेच्या यापुर्वीच्या महिलांसाठी विविध व्यवसाय प्रशिक्षण देणे या योजनेअंतर्गत / महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम या योजनेअंतर्गत ज्या महिला / मुलींनी यापुर्वी विविध प्रशिक्षण घेतलेले आहे त्यांना देखील सन २०२१-२२ या आर्थिक वर्षी त्यांच्या मागणीनुसार एकापेक्षा अधिक विषयांचे प्रशिक्षण देणेस तसेच महिला / मुलींच्या इच्छेनुसार एखादे / तेच प्रशिक्षण परत देणेस महिला सबलीकरण व सक्षमीकरण करण्याच्या हेतूने धोरण म्हणुन मान्यता असावी. सदर योजनेची उपयुक्तता ही सिध्द असल्याने व वेळोवेळी मनपातील महिला व बालकल्याण समिती / सदस्य तसेच इतरही नगरसदस्य / नगरसदस्या यांचे मार्फत वेळोवेळी योजनेचा आढावा घेतला जात असल्याने प्रदीर्घ काळासाठी ही योजना राबविणे योग्य असल्याने मनपामार्फत सदरची योजना राबविण्यात येत आहे. आधुनिक युगाच्या काळानुरुप महिलांच्या गरजेचा, त्यांच्याकडील उपलब्ध वेळेचा, कौटुंबिक जबाबदारीचा वस्तुनिष्ठ विचार करता अन्य प्रयोजनांपेक्षा सदरची योजना महिलांसाठी उपयुक्त आहे. मे. अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे काम चांगले असल्याने व त्यांची विश्वासार्हता खुपच चांगली असल्याने तसेच दर ही वाजवी असल्याने व मनपाच्या कामाचा व मनपा परिसराची त्यांना चांगली माहिती असल्याने सदर योजना त्यांचेमार्फत राबविणे मनपा हिताचे आहे. शासन धोरणानुसार / कालानुरुप सदरची योजना महिलांच्या कल्याणकारी हेतुस बळकटी आणणारी आहे. तथापि सदर योजनेतील आवश्यक बदल अथवा दुरुस्ती ही या समितीच्या मान्यतेनंतर त्याची त्वरीत अंमलबजावणी करावी. तसेच महिलांसाठी इतर अन्य कल्याणकारी उपक्रम राबविणेकामी या समितीमार्फत प्रशासनास भविष्यात जे निर्देश देण्यात येतील त्याचाच विचार करुन प्रशासनामार्फत अंमलबजावणी करण्यात यावी. प्रशिक्षण घेणेस महिलांना प्रोत्साहन मिळावे व प्रशिक्षण घेण्यासाठी आर्थिक कारण त्यांना बाधक होऊ नये यासाठी व कुठलीही इच्छुक महिला प्रशिक्षणापासून वंचित राहु नये या कल्याणकारी उद्देशास पुरक व सुसंगत धोरण असावे या उद्देशाने सदर योजनेअंतर्गतच्या प्रशिक्षणासाठी प्रशिक्षणास इच्छुक महिलांकडुन यापुर्वी प्रमाणे प्रशिक्षण शुल्काच्या १०% प्रमाणे होणारी लाभार्थी सहभाग शुल्काची रक्कम स्विकारण्यात येऊ नये. म्हणजेच महिलांना मोफत प्रशिक्षणास धोरण म्हणुन मान्यता असावी. वस्तीपातळीवर योजनेचा सुयोग्य प्रचार व प्रसार होणेसाठी तसेच महिलांना योजनेच्या अटी व शर्तीची स्पष्टपणे माहिती होणेसाठी सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाच्या कामासाठी दिलेल्या मान्यतेनुसार प्रशासकीय पातळीवर आवश्यक असल्यास लाभार्थी पात्रता निकष (अटी व शर्ती) यामध्ये योग्य तो बदल करणेत यावा. तसेच सन २०२०-२१ या आर्थिक वर्षी प्रमाणेच सन २०२१-२२ या आर्थिक वर्षी देखील सदर योजनेअंतर्गतच्या प्रशिक्षणास शैक्षणिक अर्हता फक्त साक्षर अशी ठेवण्यात यावी. शासन निर्णयास अनुसरुन महिला व बालकल्याण समितीची निर्मिती करणेत आलेली आहे. व सदर समितीस महिला व बालकल्याण यांचे संदर्भात आवश्यक त्या कल्याणकारी योजना राबविणे संबंधीतचे धोरण ठरविणेस मान्यता / अधिकार आहेत. त्यामुळे सदर समितीच्या निर्देशाशिवाय अथवा सुचनेशिवाय प्रशासनाने सदर योजनेसंबंधीत अंमलबजावणीबाबत परस्पर निर्णय घेऊ नयेत मा. नगरसदस्यांच्या, त्या त्या भागातील प्रतिष्ठीत नागरिकांच्या तसेच प्रशासनाच्या देखरेखीखाली संस्थेमार्फत प्रशिक्षणाचे आयोजन होत असते, तसेच सदर योजनेच्या कामाची मे. अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था या संस्थेच्या विश्वासार्हतेची खात्री झाली आहे. प्रशिक्षणातील विलंब टाळण्याच्या दृष्टीने तसेच प्रशिक्षणाच्या विलंबाबाबतच्या कुठल्याही तक्रारीस वाव राहु नये या हेतूने यापुर्वीप्रमाणेच मे अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, पुणे / मुंबई यांना वस्तीपातळीवरुन इच्छुक महिला गटांच्या प्रशिक्षणाच्या अटी व शर्तीनुसारच्या कागदपत्रांच्या फाईल्स स्विकारणेस मान्यता असावी. अशा प्रकारची सुचना प्रशासनाकडुन सदरील संस्थेस देण्यास यावी. झालेल्या प्रशिक्षणाची प्रत्यक्ष देयके ही सन २०२१-२२ अथवा सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाच्या सदर योजनेसाठी केलेल्या अंदाजपत्रकीय तरतुदीमधुन म्हणजेच महिलांसाठी ज्ञान कौशल्य कार्यक्रम या उपलेखाशिर्षावर उपलब्ध असणा-या / होणा-या तरतुदीतुन अदा करणेस मान्यता असावी. तसेच वस्तीपातळीवरुन ज्यांची ज्यांची मागणी असेल त्या सर्व महिलांच्या प्रशिक्षणाच्या गटनिहाय फाईल्स

स्विकारणेत याव्यात.एकाच भागातील जास्तीत जास्त महिलांना प्रशिक्षणात एकत्रितपणे प्रशिक्षण घेता यावे म्हणुन किमान २५ व जास्तीत जास्त ५० महिला या मर्यादित संख्येत प्रत्येक महिला गटांच्या प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करणेत यावेत. सदर योजनेमध्ये आवश्यकतेनुसार बदल / दुरुस्ती करण्याचे / योजना अंमलबजावणी संबंधीत निर्णय घेऊन योग्य ती कार्यवाही करुन योजना राबविण्यासंबंधीतचे व सदर योजनेअंतर्गतची देयके अदा करण्याचे सर्व अधिकार मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने मा. उप आयुक्त सो. (नागरवस्ती विकास योजना विभाग) यांना देणेस व सदर योजनेअंतर्गत होणारा प्रत्यक्ष खर्च हा " पंडीत दिनदयाल उपाध्याय – महिलांसाठी ज्ञान कौशल्य कार्यक्रम " या उपलेखाशिर्षावर चालु अथवा पुढील आर्थिक वर्षात उपलब्ध असलेल्या / होणा-या तरतुदीमधुन करणेस मान्यता देणेत यावी. संभाव्य कामापोटी संस्थेस देय असलेल्या प्रत्यक्ष प्रशिक्षण शुल्काच्या रक्कमेच्या ५% प्रमाणे होणारी रक्कम ही संस्थेकडुन अनामत (४% प्रमाणे) व लेखापरिक्षण पुर्ततेकामी (१% प्रमाणे) म्हणून आगाऊ घेणेत यावी. तथापी सदर अनामत रक्कमेच्या तुलनेत जादा काम होणार असेल तर त्यानुसारच्या संभाव्य ज्यादा कामापोटीच्या ५% प्रमाणे होणारी रक्कम संस्थेकडुन आगाऊ भरुन घेणेत यावी. सन २०२०-२१ या कालावधीतील सर्व महिला गटांचे प्रशिक्षण संस्थेने पुर्ण केलेले असल्याने व संस्थेमार्फत भरणेत आलेली एकुण ५% प्रमाणे होणारी अनामत व लेखापरिक्षण व इतर अटी व शर्तीच्या पुर्ततेकामीची रक्कम ही मोठी असल्याने सदरची ५% प्रमाणे होणारी रक्कम ही सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाच्या कामासाठी म्हणुन मनपाकडेच ठेवण्यात यावी मात्र सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाच्या संभाव्य कामापोटी संस्थेस देय असलेल्या प्रत्यक्ष प्रशिक्षण शुल्काच्या रक्कमेच्या ५% प्रमाणे होणारी फरकाची रक्कम ही संस्थेकडुन काम सुरु होणेपुर्वी आगाऊ भरुन घेणेत यावी. (म्हणजे चालुवर्षाच्या संभाव्य कामापोटी संस्थेस देय असलेल्या प्रत्यक्ष प्रशिक्षण शुल्काच्या रक्कमेच्या ५% प्रमाणे होणारी रक्कम मनपाकडे जमा असेल) सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाचे प्रशिक्षण देण्याचे काम संस्थेमार्फत पुर्ण झालेनंतर सदर रक्कमेपैकी ४% प्रमाणे अनामत रक्कम ही संस्थेस त्वरीत परत करावी. मात्र उर्वरीत १% रक्कम ही सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या आर्थिक वर्षातील कामाचे मनपातील लेखापरिक्षणानंतर, लेखापरिक्षणातील सर्व आक्षोपाधिन आक्षेप व वसुलपात्र आक्षेप याची १००% पुर्तता संस्थेमार्फत सादर झालेनंतर सदरची रक्कम संस्थेस परत देणेत यावी. तथापी याबाबत प्रशासकीय स्तरावर योग्य तो निर्णय घेणेस मान्यता देण्यात यावी. सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकामध्ये महिला व बालकल्याण योजनेसाठी आर्थिक तरतुद करणेत आलेली आहे. त्यात " पंडीत दिनदयाल उपाध्याय – महिलांसाठी ज्ञान कौशल्य कार्यक्रम " या उपलेखाशिर्षासह इतर अन्य उपलेखाशिर्षाचा समावेश आहे. तरी " पंडीत दिनदयाल उपाध्याय – महिलांसाठी ज्ञान कौशल्य कार्यक्रम " या उपलेखाशिर्षावर नागरवस्ती विकास योजना विभागाने उर्वरीत इतर अन्य महिला व बालकल्याण योजनेतील उपलेखाशिर्षांतर्गत केलेल्या तरतुदींमधुन व नागरवस्ती विकास योजना विभागाकडील इतर अन्य (महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत केलेल्या तरतुदीं व्यतिरीक्त नागरवस्ती विभागासाठी केलेल्या इतर कल्याणकारी योजनेतील अन्य उपलेखाशिर्षांतील तरतुदी मधुन) उपलब्ध तरतुदींमधुन सन २०२१-२२ या आर्थिक वर्षी व अशाचप्रकारे सन २०२२-२३ या आर्थिक वर्षी " पंडीत दिनदयाल उपाध्याय – महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम " या योजनेसाठी लाभार्थांच्या प्रतिसादानुसार प्रशिक्षणाचे वाढीव खर्चाकामी आवश्यकतेनुसार " महिलांसाठी ज्ञान कौशल्य कार्यक्रम " या उपलेखाशिर्षावर रक्कमा वर्ग करणेस व त्यानुसार " पंडीत दिनदयाल उपाध्याय – महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम " योजना ही मे. अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, पुणे/मुंबई. यांचेमार्फत सन २०२१-२२ अखेरपर्यंतच्या कालावधीत राबविणेकामी व योजनेच्या अंमलबजावणीकामीच्या धोरणास व प्रत्यक्ष होणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २३ विषय क्रमांक - ०२

दिनांक – २५/०३/२०२१

सुचक :- मा.योगिता नागरगोजे अनुमोदक : मा.निकीता कदम

संदर्भ – मा.योगिता नागरगोजे, मा.निकीता कदम यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड शहरात पिं.चिं.मनपा मार्फत लहान मुलांकरिता बालवाडी वर्ग चालविले जातात. बालवाडी वर्गात शिकत असलेल्या लहान विद्यार्थ्यांना खेळण्याकरिता खेळणी पुरविणे आवश्यक आहे. तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व बालवाडी वर्गातील विद्यार्थ्यांकरिता खेळणीच्या कपाटासहीत खेळणी पुरविण्यास, तसेच बालवाडीच्या शाळेंच्या भिंतींवर, शाळेच्या कंपाउंडवर तसेच बालवाडीच्या वर्गातील भिंतींवर बोलके चित्र काढण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २४ विषय क्रमांक - ०३

दिनांक – २५/०३/२०२१

सुचक :- मा.माधवी राजापुरे अनुमोदक : मा.योगिता नागरगोजे

संदर्भ – मा.माधवी राजापुरे, मा.योगिता नागरगोजे यांचा प्रस्ताव.

बालवाडीच्या वर्गातील मुलांच्या सर्वांगिण विकासात्मकासाठी साहित्यदर्शन, पुणे ही संस्था गेली अनेक वर्षांपासुन महाराष्ट्रातील नामवंत प्रकाशन संस्थांची बालवाडीतील मुलांसाठी अवांतर वाचनासाठी पुस्तकांचा पुरवठा करित आहेत. तरी सदर संस्थेस बालवाडीतील मुलांसाठी अवांतर वाचनासाठी पुस्तकांचा पुरवठा करणेची संधी देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २५ विषय क्रमांक - ०४

दिनांक – २५/०३/२०२१

सुचक :- मा.सविता खुळे अनुमोदक : मा.निकिता कदम

संदर्भ – मा.सविता खुळे, मा.निकिता कदम यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड शहरातील बचत गटांना महापालिकेमार्फत अनुदान दिले जाते. बचत गट अनुदान हे १ वर्षाने दिले जाते व त्यानंतर १० वर्षाने दिले जात आहे. तरी अनुदान देयचा कालावधी जास्तीचा न ठेवता बचत गटांना अनुदान हे १.५ वर्षाने, ३.५ वर्षाने, ७.५ वर्षाने व १० वर्षाने देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २६ विषय क्रमांक - ०५

दिनांक – २५/०३/२०२१

सुचक :- मा.सविता खुळे अनुमोदक : मा.निकिता कदम

संदर्भ – मा.सविता खुळे, मा.निकिता कदम यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत महिला व बालकल्याण योजने अंतर्गत विविध लोककल्याणकारी योजना राबविल्या जातात. पिंपरी चिंचवड शहरातील विधवा / घटस्फोटीत महिला स्वावलंबी होण्यासाठी महापालिकेच्या वतीने पुरेशी आर्थिक

मदत करण्याचे नियोजन आहे. माहे मार्च २०२० पासुन कोरोना (कोव्हीड-१९) विषाणुचा प्रसार मोठ्या प्रमाणावर वाढल्याने अनेक घरांमधील कर्ता पुरुषांचे कोरोना (कोव्हीड-१९) या विषाणुमुळे प्राण गमवावे लागले आहेत. त्यामुळे शहरातील ब-याच घरांमध्ये कर्ता व्यक्ती नसल्याने संबंधित घरांमध्ये आर्थिक झळ कुटुंबातील सदस्यांना सोसावी लागत आहे. तथापि, घरातील कर्ता व्यक्ती निर्वतल्यानंतर त्यांचेवर अवलंबून असणा-या कुटुंबातील इतर सदस्यांची कौटुंबिक आर्थिक परिस्थिती बिकट होत असल्याची बाब नाकारता येत नाही. तरी शहरातील विधवा महिला आत्मनिर्भर होण्यासाठी त्यांची आर्थिक गरज व कौटुंबिक अडीअडचणी लक्षात घेता विधवा झालेल्या महिलांना एक वेळेस ५०,०००/-(अक्षरी र.रु पन्नास हजार फक्त) चे अर्थसहाय्य करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २७ विषय क्रमांक - ०६

दिनांक – २५/०३/२०२१

सुचक :- मा.योगिता नागरगोजे अनुमोदक : मा.निकिता कदम

संदर्भ – मा.योगिता नागरगोजे, मा.निकिता कदम यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व बालवाडया,सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये वॉटर फिल्टर व वॉटल कुलर(एकत्रित युनिट) बसविणेकामी M/s ZENCO INDUSTRIES या संस्थेस थेट पध्दतीने काम देणेस मान्यता देणेत येत आहे..

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २८ विषय क्रमांक - ०७

दिनांक – २५/०३/२०२१

सुचक :- मा.सविता खुळे अनुमोदक : मा.योगिता नागरगोजे

संदर्भ – मा.सविता खुळे, मा.योगिता नागरगोजे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील महिलांच्या आरोग्याच्या दृष्टीने मासिक पाळी दरम्यान वापरल्या जाणा-या पॅड वापराचे प्रमाण अत्यल्प आहे, त्यामुळे हे प्रमाण वाढविण्यासाठी तसेच वापरल्या जाणा-या पॅडचे विघटन होण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे. सॅनिटरी नॅपकिन व्हेंडिंगच्या वापरातून अल्प दरात उत्तम दर्जाचे नॅपकिन उपलब्ध करून देता येईल. पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत येणा-या सार्वजनिक शौचालये, संपुर्ण म.न.पा. कार्यालये व दवाखाने या भागात पॅड वापराचे प्रमाण वाढविण्यासाठी मदत होईल व नॅपकिन विघटनाचे नियोजन सॅनिटरी नॅपकिन डिस्पोजल मशीन मार्फत केले जाईल. या उपक्रमाचा सकारात्मक विचार करून हा उपक्रम राबविणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २९ विषय क्रमांक - ०८

दिनांक – २५/०३/२०२१

सुचक :- मा.सविता खुळे अनुमोदक : मा.योगिता नागरगोजे

संदर्भ – मा.सविता खुळे, मा.योगिता नागरगोजे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड शहरात मुकबधीर, मतिमंद, अंध व अंपगत्व असणारे बरेच नागरिक दारिद्र्य रेषेखालील आहेत. त्यांची आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे वैयक्तिकरित्या त्यांचे विवाह सोहळा पार पाडणे त्यांच्याकडून शक्य होत नसल्याचे वारंवार दिसून येत आहे. अशा मुकबधीर, मतिमंद, अंध व अंपगत्व असणा-या गरजू नागरिकांकरिता महानगरपालिकेमार्फत त्यांचे सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करत राहण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( लोखंडे चंदा राजू )**

**सभापती**

महिला व बालकल्याण समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय

क्रमांक : नस/४/कावि/१८५/२०२१

दिनांक : ३०/०३/२०२१

**( उल्हास बबनराव जगताप )**

**नगरसचिव**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - ४११ ०१८

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

**(विषय क्रमांक १ शी संलग्न)**

(मा.महिला व बालकल्याण समिती सभा ठराव क्रमांक…………..दिनांक ……/……./२०२१ लगतचे "प्रपत्र – अ" )

| अ.क्र | विषयाचे नाव | प्रशिक्षण कार्यक्रम कालावधी दररोज २ तास | | प्रति लाभार्थी प्रत्यक्ष प्रशिक्षण शुल्क र.रु. | प्रत्यक्ष प्रशिक्षण शुल्कावर १८% प्रमाणे होणारी जीएसटीची र.रु. | एकुण प्रशिक्षण शुल्क (प्रत्यक्ष प्रशिक्षण शुल्क + १८% प्रमाणे जीएसटीच्या रक्कमेसह होणारी रक्कम) र.रु. | संस्थेला देय एकुण प्रशिक्षण शुल्क (एकुण प्रशिक्षण शुल्काच्या कॉलम क्र. ६ नुसारच्या रक्कमेच्या ९०% प्रमाणे होणारी रक्कम) र.रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | दिवस | तास | | | | |
| १ | २ | ३ | | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | बँकींग व आकाउन्टींग प्रशिक्षण. | ४५ दिवस | ९० तास | ३३७५.०० | ६०७.५० | ३९८२.५० | ३५८४.२५ |
| २ | ऑरनामेंट मेकींग प्रशिक्षण. | ६० दिवस | १२० तास | ४५००.०० | ८१०.०० | ५३१०.०० | ४७७९.०० |
| ३ | फिटनेस ट्रेनिंग. (योगा, मेडिटेशन, डायटिंग) | ४५ दिवस | ९० तास | ३३७५.०० | ६०७.५० | ३९८२.५० | ३५८४.२५ |
| ४ | महिला सुरक्षारक्षक प्रशिक्षण. | २० दिवस | ४० तास | १५००.०० | २७०.०० | १७७०.०० | १५९३.०० |
| ५ | नेल आर्ट, स्कीन, मेकओव्हर टेक्नोलॉजी प्रशिक्षण. | १२० दिवस | २४० तास | ९०००.०० | १६२०.०० | १०६२०.०० | ९५५८.०० |
| ६ | विविध प्रकारचे पोशाख व फॅन्सी असेसरीज तयार करणेचे प्रशिक्षण. | १२० दिवस | २४० तास | ९०००.०० | १६२०.०० | १०६२०.०० | ९५५८.०० |
| ७ | स्पोकन इंग्लिश, संभाषण कौशल्य व व्यक्तीमत्व विकास प्रशिक्षण. | ९० दिवस | १८० तास | ६७५०.०० | १२१५.०० | ७९६५.०० | ७१६८.५० |
| ८ | होम डेकोर आर्ट प्रशिक्षण. | ६० दिवस | १२० तास | ४५००.०० | ८१०.०० | ५३१०.०० | ४७७९.०० |
| ९ | सेंद्रिय खते व आयुर्वेदिक रोपे तयार करणेचे प्रशिक्षण. | २० दिवस | ४० तास | १५००.०० | २७०.०० | १७७०.०० | १५९३.०० |
| १० | विविध प्रकारचे हर्बल वस्तुंचे उत्पादन तयार करणेचे प्रशिक्षण. | ४५ दिवस | ९० तास | ३३७५.०० | ६०७.५० | ३९८२.५० | ३५८४.२५ |
| ११ | रुखवत व सभारंभ सजावट प्रशिक्षण. | ३० दिवस | ६० तास | २२५०.०० | ४०५.०० | २६५५.०० | २३८९.५० |
| १२ | फुड प्रिपरेशन व सर्व्हिसेस प्रशिक्षण. | ६० दिवस | १२० तास | ४५००.०० | ८१०.०० | ५३१०.०० | ४७७९.०० |
| १३ | डिजीटल साक्षरता प्रशिक्षण | ३० दिवस | ६० तास | २२५०.०० | ४०५.०० | २६५५.०० | २३८९.५० |
| १४ | आर्ट अण्ड क्राफ्ट प्रशिक्षण. | ३० दिवस | ६० तास | २२५०.०० | ४०५.०० | २६५५.०० | २३८९.५० |

सुचक –

अनुमोदक –

७१६

पंडीत दिनदयाल उपाध्याय – महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम.

सन २०२१-२२

महिला लाभार्थ्यांसाठीचे पात्रता निकष. (अटी व शर्ती) :-

१) महिला / मुलीच्या नावे आधारकार्ड / आधारकार्ड काढलेबद्दलची पोच पावती (रहिवाशी प्रत) ची साक्षांकित सत्यप्रत आवश्यक.
२) पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत वास्तव्य असणे आवश्यक.
३) कुठल्याही उत्पन्न गटातील महिला / मुलींना सदर प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी होता येईल. मात्र त्यासाठी वय वर्ष १६ पूर्ण असणे आवश्यक.
४) वास्तव्याच्या / वयाच्या पुराव्यार्थ महिलांच्या नावे / नाव असलेले :- आधारकार्ड / आधारकार्ड काढलेबद्दलची पोच पावती (रहिवाशी प्रत) / घरपट्टी (मिळकतकर) पावती / पिं.चिं.म.न.पा.चे झोपडपट्टीधारक म्हणुन ओळखपत्र / मतदार ओळखपत्र / पॅनकार्ड / विद्युत बील / टेलिफोन बील / राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक / रेशनकार्ड इ. तत्सम् कागदपत्रे यापैकी एक कागदपत्र (साक्षांकित सत्यप्रत) पुराव्यार्थ सादर करावे लागेल.
५) सदर प्रशिक्षणास इच्छुक महिला साक्षर असणे आवश्यक. त्यानुसार शैक्षणिक अर्हतेच्या पुराव्यार्थ कुठलीही कागदपत्रे सादर करणेची आवश्यकता नाही.
६) २५ ते ५० महिला या मर्यादेत प्रत्येक महिलांच्या गटांनी गटप्रमुखामार्फत आवश्यक त्या कागदपत्रांसह (साक्षांकित सत्यप्रत) व प्रत्येक महिलेच्या फोटोसह विहीत नमुन्यात फाईल सादर करणे आवश्यक.
७) लग्नानंतरच्या किंवा इतर कारणास्तव नाव बदलाबाबतच्या पुराव्यार्थ पॅनकार्ड / लग्नपत्रिका / विवाह नोंदणी दाखला / रक्कम रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर केलेले प्रतिज्ञापत्र इत्यादी तत्सम् कागदपत्रे. यापैकी एक कागदपत्र (साक्षांकित सत्यप्रत) पुराव्यार्थ सादर करावे लागेल.